महाराष्ट्र शासन कृषि विभाग

# कापुस

## एकात्मिक पिक व्यवस्थापन



कापुस ते कापड अभियान-२००७

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जळगाव



महाराष्ट्र शासन | कृषि विभाग

# बी.टी. कापसाच्या लागवडी बाबत घ्यावयाची काळजी

१. बी. टी. कापूस मध्यम व भारी जमिनीतच लावा.
२. पुर्व हंगामी बी. टी. कापसाची लागवड १५ मे नंतरच करावी.
३. बी. टी. कापूस लागवड ओलीताखाली अधिक फायदेशिर आहे.
४. हमखास पाऊसाच्या प्रदेशातील कोरडवाहू क्षेत्रासाठी खालील वाणांची लागवड करा.

| | | |
|---|---|---|
| अंकुर – ६५१ | कृषिधन –९६३२ (मारुती) | अजित – ११ |
| राशी – १४४ | महिको – ७३०१ (बीजी–२) | महिको – ६३०१ |

५. उर्वरीत मान्यता प्राप्त वाण हे बागायती क्षेत्रासाठी वापरावे.
६. एका फुलीवर दोन बियांची टोकन करा म्हणजेच ४५० ग्रॅम प्रती अर्धा एकर.
७. बी. टी. ची लागवड सरीवरंबा पध्दतीने अथवा ठिबक सिंचनाखाली करा.
८. पिक लागवडी पुर्वी जमिनीत शेणखत / सेंद्रीय खतांचा पहिला हप्ता द्या.
९. पेरणी नंतर ४० ते ४५ दिवसांनी रस शोषण करण्याऱ्या किडींचे व्यवस्थापन करा.
१०. बी. टी. चे शासनमान्य बियाणे अधिकृत उत्पादक अथवा विक्रेत्याकडूनच खरेदी करा व पावती घ्या.
११. बी.टी. कापसाची पेरणी करतांना बियाणे सोबत दिलेल्या नॉनबीटी वाणाची (रिफ्युजी) लागवड करावी.
१२. कापूस पिकात आंतरपिक म्हणून मुग, उडीद, सोयाबिन, चवळी व सापला पिकांचा समावेश करावा.
१३ बी.टी. कापूस वाणांचे बोंडाचे टिकण्याचे प्रमाण जास्त असलेने शिफारशीपेक्षा अतिरिक्त खताची मात्रा (उत्पादकाने सुचविल्याप्रमाणे) देणे आवश्यक आहे – उदा.

ज्या शेतकऱ्यांना १०:२६:२६ हे संयुक्त खत वापरावयाचे असल्यास (मात्रा प्रति एकर)

| अ.क्र. | खत देण्याची वेळ | १०:२६:२६ | युरिया | म्युरेट ऑफ पोटॅश |
|---|---|---|---|---|
| १ | लागवडीच्या वेळी किंवा ८–१० दिवसापर्यंत | ५० किलो | १५किलो | १५ किलो |
| २ | ३० दिवसा पर्यंत | ५० किलो | ५० किलो | --- |
| ३ | ६० दिवसा पर्यंत | --- | २५ किलो | --- |

ज्या शेतकऱ्यांना डी.ए.पी. हे संयुक्त खत वापरावयाचे असल्यास

| अ.क्र. | खत देण्याची वेळ | डि.ए.पी. | युरिया | म्युरेट ऑफ पोटॅश |
|---|---|---|---|---|
| १ | लागवडीच्या वेळी किंवा ८–१० दिवसापर्यंत | ५० किलो | --- | ४० किलो |
| २ | ३० दिवसा पर्यंत | --- | ५० किलो | --- |
| ३ | ६० दिवसा पर्यंत | --- | २५ किलो | १५ किलो |

१४. लाल्या रोगाच्या व्यवस्थापनेसाठी प्रति एकर१० किलो मॅग्नेशीयम सल्फेट पहिल्या खताच्या डोस बरोबर द्यावे तसेच पिक ६५–७० दिवसांचे असतांना १% मॅग्नेशियम सल्फेट व २% डीएपीच्या दोन ते तीन फवारण्या कराव्यात.
१५. कमी खर्चात जास्तीचे उत्पादन घेण्यासाठी एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा वापर करावा.
१६. कापूस पिकाची स्वच्छ वेचणी व योग्य साठवण करावी.

**अधिक माहितीसाठी – किसान कॉल सेंटरचा दुरध्वनी क्र. १५५१ वर संपर्क करावा.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उपविभागीय कृषि अधिकारी: | जळगांव | ०२५७ – २२२९३१७ | अमळनेर | ०२५८७ – २२२५१६ | पाचोरा | ०२५९६ – २४४३४३ |
| तालुका कृषि अधिकारी : | जळगांव | ०२५७ – २२४००४७ | भुसावळ | ०२५८२ – २२२९३९ | बोदवड | ०२५८२ – २७५८९२ |
| | मुक्ताईनगर | ०२५८३ – २२२७४२ | रावेर | ०२५८४ – २५११४७ | यावल | ०२५८५ – २६११३६ |
| | पाचोरा | ०२५९६ – २४४६२९ | भडगांव | ०२५९६ – २८३५०८ | चाळीसगांव | ०२५८९ – २२२४६५ |
| | जामनेर | ०२५८० – २३०००६ | अमळनेर | ०२५८७ – २२२६७५ | एरंडोल | ०२५८८ – २४४१६८ |
| | पारोळा | ०२५९७ – २२२४३६ | चोपडा | ०२५८६ – २२०२१६ | | |

कृषि सहाय्यक / कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जळगांव